**अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, मुंबई**

# मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०१७ - सुधारित सविस्तर जाहिरात

**(मदतीसाठी दूरध्वनी क्रमांक:- ०२२ – २६३८३०१४)**

**दिनांक: १७/०६/२०१७**

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | एकूण फेलो संख्या |
|---|---|---|
| १ | मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम<br>**शासकीय सेवा 'गट-अ' समकक्ष**<br>[₹ ३५,००० + प्रवासभत्ता ₹ ५,०००] | ५०<br>[१/३ जागा महिला उमेदवारांसाठी] |

१. **पात्रता विषयक अटी** :-

**क) निवडीसाठी शैक्षणिक आर्हता :- दिनांक ५ जून, २०१७** रोजी कोणत्याही शाखेतील पदवीधर (किमान ६०% गुण आवश्यक) याशिवाय अधिक उच्च शिक्षणास प्राधान्य असेल.

**ख) अनुभव :- दिनांक ५ जून, २०१७** रोजी किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून त्यांनी पूर्णवेळ इंटर्नशिप/ अॅप्रेंटिसशिप/ आर्टिकलशिप केली असल्यास, हा कालावधी अनुभवाचा कालावधी म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

**ग) भाषा व संगणक ज्ञान** :- मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक राहील. हिंदी आणि इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक आहे. तसेच, संगणक हाताळणी व इंटरनेटचे ज्ञान आवश्यक राहील.

**घ) वयोमर्यादा** :- दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी अर्जदाराचे वय २१ वर्षा पेक्षा कमी व २६ वर्षा पेक्षा जास्त नसावे. (जन्म दिनांक २ एप्रिल, १९९१ ते दिनांक १ एप्रिल, १९९६ च्या दरम्यान असावा.)

**ङ) फेलोंचा दर्जा** :- फेलोंचा दर्जा शासकीय सेवेतील गट- अ अधिकाऱ्याच्या समकक्ष असणार आहे.

२. **फेलोंची संख्या**:- सदरहू कार्यक्रमाकरिता फेलोंची संख्या ५० अशी निश्चित करण्यात आली असून, त्यापैकी १/३ जागा महिला फेलोंसाठी राखीव असतील. १/३ एवढ्या महिला फेलो उपलब्ध न झाल्यास त्या जागी पुरुष फेलोंची निवड करण्यात येईल.

३. **अर्ज करण्याची पद्धत** :-

**क)** सदरहू जाहिरातीस अनुसरून ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत केवळ ऑनलाईन पद्धतीने प्राप्त होतील अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. उमेदवारांची माहिती ऑनलाईन (On Line) अर्जाद्वारे संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने अर्ज भरण्यासाठी विहित केलेला नमुना अर्ज व अर्ज भरावयाची माहिती **http://mahades.maharashtra.gov.in** व **http://www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. संचालनालयाच्या **http://mahades.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर 'APPLY ONLINE' (CM Fellowship Program 2017) लिंकवर ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

**ख)** उमेदवारांचे ऑनलाईनच भरलेले अर्ज स्वीकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी. विहित नमुन्यानुसार/निकषानुसार अर्ज नसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा अधिकार संचालनालय स्वत:कडे राखून ठेवत असून यासंदर्भात उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही.

ग) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे व अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. ऑनलाईन अर्जातील माहिती अचूक नोंदविली जाईल याची खबरदारी उमेदवारांनी स्वत: घ्यावी. अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी / विवरणेच ग्राहय धरण्यात येतील. अर्ज सादर केल्यानंतर दिलेली माहिती / विवरणपत्रे ग्राहय धरण्यात येणार नाहीत. अर्जात नोंदविलेल्या माहितीबाबत संचालनालय जबाबदार राहणार नाही.

घ) **ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्राचा पुरावा जसे की शैक्षणिक अर्हता, वय तसेच प्रमाणपत्राच्या मूळ प्रती व त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या प्रती, ई - पावतीची प्रत, सिस्टीम जनरेटेड अर्जासोबत प्रमाणपत्र / कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करावी लागेल.**

ङ) अर्जामध्ये केलेला दावा व सादर केलेल्या कागदपत्रामधील माहिती यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती खोटी समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल. यासाठी संचालनालय जबाबदार राहणार नाही.

च) उमेदवाराने दि. ०१ / ०६ / २०१७ ते दि. २२ / ०६ / २०१७ पर्यंत अर्ज करावा. **ऑनलाईन अर्ज दि. २२ / ०६ / २०१७ वेळ २३ वा. ५९ मि. पर्यंतच स्विकारण्यात येतील.**

छ) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी खालील सूचनांचे पालन करावे.

ज) उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक परीक्षेचा निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा/अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल. तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना अर्थ व सांख्यिकी संचालनालय जबाबदार असणार नाही. अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत उमेदवाराच्या ई-मेल आयडीवर परीक्षेचे प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. उमेदवाराने आपल्या ई-मेल आयडीची कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तींबरोबर देवाण-घेवाण करु नये. एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा ई-मेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

झ) परीक्षेकरीता विहित केलेले शुल्क **फक्त ऑनलाईन पद्धतीने** भरणे आवश्यक आहे.

ञ) अर्जासोबत भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही. ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर चार्जेस उमेदवाराला स्वत: भरावे लागतील. परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरल्यानंतर मिळणाऱ्या ई- पावतीची (Transaction successful झाल्यानंतर) प्रिंट काढून स्वत:जवळ ठेवणे आवश्यक राहील. परीक्षेच्या वेळी सदर ई- पावतीची छायांकित प्रत प्रवेशपत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे.

ट) दिलेल्या सूचनांप्रमाणे उमेदवाराचा स्कॅन केलेला फोटो व स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी विहित केलेल्या नमुन्यात असणे आवश्यक आहे.

## ४. ऑनलाईन अर्ज करण्याबाबतच्या सूचना:-

क) उमेदवाराने प्रथम संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन 'APPLY ONLINE' (CM Fellowship Program 2017) लिंक वर क्लिक केल्यावर ऑनलाईन अर्ज स्क्रिनवर दिसेल.

**ख)** अर्ज नोंदणी करण्याकरीता “Click here for New Registration” हा टॅब निवडून त्यामध्ये नाव, संपर्काची माहिती व ई-मेल आयडी नमूद करावा. त्यानंतर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर स्क्रीनवर दिसेल. अर्जदाराने सदर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर स्वत:कडे लिहून ठेवावा. सदर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड उमेदवारांना ई-मेल व एसएमएसद्वारे पाठविण्यात येईल. उमेदवाराला अर्जात काही दुरुस्ती करावयाची असल्यास तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डचा उपयोग करुन दुरुस्त्या करता येतील.

**ग)** जर उमेदवार एकाच वेळी अर्ज पूर्णपणे भरु शकला नाही तर भरलेली माहिती “SAVE AND NEXT” या टॅबचा वापर करुन SAVE करता येईल. ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापूर्वी उमेदवाराने “SAVE AND NEXT” या सुविधेचा वापर करुन भरलेली माहिती तपासून पहावी व आवश्यकतेनुसार त्यामध्ये दूरुस्ती करावी. दृष्टीने अधू असलेल्या उमेदवारानी ऑनलाईन अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम Submit करण्यापूर्वी सर्व माहिती योग्य असल्याची खात्री करावी.

**घ)** उमेदवाराने स्वत:चे/वडिलांचे/पतीचे नाव तसेच नावांचे स्पेलिंग योग्यरित्या भरणे आवश्यक आहे. सदरची माहिती योग्य पद्धतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**ङ)** उमेदवाराने भरलेली माहिती तपासण्यासाठी व Save करण्यासाठी “Validate your details” and “Save and Next” या बटनांचा वापर करावा.

**च)** उमेदवाराने मुद्दा क्र. ७ मध्ये देण्यात आलेल्या सूचनांप्रमाणे छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅन व अपलोड करावी.

**छ)** ऑनलाईन अर्ज अंतिम सबमिट करण्यापूर्वी “Preview” टॅबवर क्लिक करुन संपूर्ण अर्ज तपासून पहावा.

**ज)** आवश्यकतेनुसार ऑनलाईन अर्जातील माहितीमध्ये सुधारणा करुन, तसेच छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड झाल्याची व इतर माहिती अचूक असल्याची खात्री करुन “FINAL SUBMIT” बटनवर क्लिक करावे.

**झ)** “Payment” बटनावर क्लिक करुन परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरावे.

**ञ)** त्यानंतर “Submit” बटनावर क्लिक करावे.

**ट)** उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना काळजी घ्यावी. उमेदवाराने सदर अर्जात स्वत:बाबतची माहिती अचूक भरावी. तसेच विहित आकारातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अप-लोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर, छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अप-लोड केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क योग्य पद्धतीने भरल्यानंतरच “Submit” बटन प्रेस करावे. एकदा सबमिट बटनावर क्लिक केल्यावर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणे शक्य होणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही. सदरची माहिती योग्य पद्धतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**ठ)** अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही संचालनालयाने विहीत केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. असे न केलेले ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

## ५. <u>ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची पद्धत</u> :-

**क)** ऑनलाईन अर्ज हा परीक्षा शुल्क भरण्याच्या सुविधेसह (Payment Gateway) एकत्रित उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**ख)** परीक्षा शुल्क फक्त RuPay /Maestro/MasterCard/Visa/Credit Card/IMPS/ Cash Card/Mobile Wallet अथवा Internet Banking द्वारे भरता येईल. उमेदवारास परीक्षा शुल्क RuPay /Maestro/MasterCard/Visa/Credit Card/IMPS/ Cash Card/Mobile Wallet अथवा Internet Banking द्वारे भरण्याची सुविधा स्क्रिनवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**ग)** ऑनलाईन परीक्षा शुल्काचे सबमिशन केल्यानंतर थोडावेळ वाट पाहणे आवश्यक आहे. सदर कालावधीत कोणत्याही परीस्थितीत **Back** किंवा **Refresh** बटण प्रेस करु नये.

**घ)** ऑनलाईन ट्रान्झॅक्शन यशस्वी झाल्यानंतर ई-पावती (E-Receipt) तयार होईल. ई-पावती तयार न होणे शुल्क भरले गेले नाही असे दर्शविते.

**ङ)** उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे यशस्वी न झाल्यास (Payment Failure) उमेदवाराला तात्पूरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डच्या आधारे पुन्हा लॉग ईन करावे लागेल. उमेदवाराचे ऑनलाईन ट्रान्झॅक्शन यशस्वी न झाल्यास स्क्रिनवर Your online transaction was unsuccessful Please register again असा संदेश दिसेल. अशावेळी उमेदवाराने ऑन-लाईन लिंकवर जाऊन पुन:श्च लॉग ईन करणे आवश्यक आहे.

**च)** **नोंदणी यशस्वी झाल्यानंतर उमेदवारास ई-पावती इंटरनेटद्वारे संगणकावर उपलब्ध होईल. उमेदवाराने सदर ई-पावती व ऑनलाईन अर्जाची प्रिंट आऊट काढून ठेवणे आवश्यक आहे. परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरल्यानंतर प्राप्त झालेली ई-पावती उमेदवाराने स्वत:कडे ठेवावी. परीक्षा शुल्क भरल्याची ई-पावती उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेच्या वेळी प्रवेशपत्रासोबत सादर करावी.**

**छ)** क्रेडीट कार्डाने परीक्षा शुल्क भरतांना भारतीय चलनाचीच नोंद करावी.

**ज)** आपले रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यानंतर ब्राऊझर विंडो बंद करण्याची दक्षता घ्यावी.

**झ)** उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी विहित जागी अप-लोड केल्यानंतर स्क्रिनवर संपूर्ण अर्ज दिसेल. सदर अर्ज योग्य पद्धतीने भरण्यात यावा. उमेदवाराचे छायाचित्र अथवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

**६. <u>अर्ज भरण्याच्या महत्वाच्या सूचना:-</u>**

**क)** रजिस्ट्रेशन व परीक्षा शुल्क पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने **संपूर्ण अर्जाची प्रिंटआऊट घेणे आवश्यक आहे.** ऑनलाईन अर्जाची माहिती भरण्यास उमेदवार स्वत: जबाबदार आहे. त्यास संचालनालय कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

**ख)** उमेदवाराने विहित मुदतीत ऑनलाईन अर्जासोबत परीक्षा शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. जेणेकरुन शेवटच्या क्षणी अडचण येणार नाही.

**ग)** उमेदवाराने अर्जात स्वत:चे नांव, जन्मदिनांक, मोबाईल नंबर व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास संचालनालय जबाबदार राहणार नाही.

**घ)** उमेदवाराचा रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड योग्य पद्धतीने रजिस्ट्रेशन झाल्यानंतर त्याच्या ई-मेल आयडी/ मोबाईल नंबरवर संदेश पाठविण्यात येईल. जर उमेदवाराला ई-मेल किंवा एस.एम.एस द्वारे सूचना मिळाली नाही तर त्याचा अर्ज योग्य पद्धतीने रजिस्टर झाला नाही असे समजावे.

**ङ)** अपूर्ण अर्ज उदा. छायाचित्र आणि स्वाक्षरी इत्यादी नसलेले अवैध ठरविण्यात येतील.

**च)** वरील कार्यपद्धती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे. याशिवाय दुस-या पद्धतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविले जातील.

**छ)** अर्जात भरलेल्या पत्त्यामध्ये किंवा इतर माहितीमध्ये बदल करता येणार नाही.

**ज)** उमेदवाराने अर्जावर अपलोड केलेल्या स्वाक्षरी प्रमाणेच प्रवेशपत्र व उपस्थिती पत्रावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे

**झ)** तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेल्या छायाचित्राप्रमाणेच छायाचित्र प्रवेशपत्र व उपस्थितीपत्रावर चिकटवणे आवश्यक आहे.

## ७. छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याच्या सूचना:-

उमेदवाराने खाली नमूद केल्याप्रमाणे त्याचे छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अर्ज भरते वेळी अपलोड करणे आवश्यक आहे.

**क) छायाचित्र:-**

१) अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र असावे.

२) सदरचे छायाचित्र हे फिकट, रंगीत किंवा पांढ-या रंगाचा पृष्ठभाग असलेले असावे.

३) कॅमेराकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे. सूर्य प्रकाशात जर छायाचित्र काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी. जर फ्लॅशचा वापर केल्यास red eye येणार नाही याची दक्षता घ्यावी.

४) जर तुम्ही चष्मा वापरत असाल तर तुमचे डोळे दिसतील अशाप्रकारे छायाचित्र असावे.

५) छायाचित्र काढते वेळी टोपी, हॅट व गॉगल घालू नये, जेणेकरुन चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) छायाचित्र २०० x २३० pixels एवढे असावे व त्याचा आकार २० kb ते ५० kb इतका असावा. स्कॅन केलेले छायाचित्र हे ५० kb पेक्षा मोठे नसेल याची दक्षता घ्यावी. जर त्याचा आकार ५० kb पेक्षा मोठा असेल तर ते adjust करण्यात यावे.

**ख) स्वाक्षरी:-**

१) उमेदवाराने काळया शाईच्या पेनाने पांढ-या कागदावर स्वाक्षरी करावी.

२) सदरची स्वाक्षरी ही उमेदवाराचीच असावी. सदरची स्वाक्षरी ही ऑनलाईन अर्जावर ज्या ठिकाणी अपलोड करणे आवश्यक आहे तेथे अपलोड करण्यात यावी.

३) अर्जासोबत अपलोड केलेली स्वाक्षरी व उपस्थिती पत्रावरील स्वाक्षरी भिन्न असेल तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

४) स्वाक्षरीचा आकार १० kb ते २० kb व त्याचे dimensions १४० x ६० pixels एवढे असावे.

५) स्वाक्षरीची स्कॅन केलेली इमेज ही २० kb पेक्षा जास्त नसेल याची दक्षता घ्यावी.

**ग) छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याची पद्धत:-**

१) छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावयाची आहे. त्यासाठी स्कॅनरचे रिझॉल्यूशन हे २०० डी.पी.आय. (Dots per inch) एवढे असावे.

२) कलर हा true colour व फाईलची साईज ही उपरोक्त प्रमाणे सेट करण्यात यावी.

३) उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार छायाचित्र व स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. त्याची फाईल ही JPG किंवा JPEG format मध्ये असावी.

४) जर मुद्दा क्रमांक ३ नुसार छायाचित्र व स्वाक्षरी नसेल तर स्क्रिनवर error message दिसेल.

५) छायाचित्र व स्वाक्षरी अप-लोड करण्यासाठी ऑनलाईन अर्जात लिंक देण्यात आली आहे.

**घ) छायाचित्र व स्वाक्षरी अप-लोड करण्याची पद्धत :-**

१) छायाचित्र व स्वाक्षरी अप-लोड करण्यासाठी Upload Photograph व Upload Signature या दोन स्वतंत्र लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. योग्य त्या लिंकवर क्लिक करावे व त्यानंतर छायाचित्र / स्वाक्षरी असलेली File सिलेक्ट करावी व अपलोड बटनावर क्लिक करावे.

२) उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी ही उपरोक्त पद्धत अवलंबिल्याशिवाय अपलोड होणार नाही याची नोंद घ्यावी.

**उमेदवाराचे छायाचित्र अथवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.**

## ८. परीक्षा शुल्क :-

उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे परीक्षा शुल्क ऑनलाईन भरावयाचे आहे. सदर शुल्क हे ऑनलाईन स्वरूपातच भरणे आवश्यक आहे व ते ना परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

| योजनेचे नाव | परीक्षा शुल्क |
|---|---|
| मुख्यमंत्री फेलोशिप योजना | ₹ ५००/- |

**टिप** :- उमेदवाराने परीक्षा शुल्कासोबत बँकेच्या नियमानुसार सेवा कर व इतर कर ऑनलाईन पद्धतीने भरणे आवश्यक राहील.

**क)** परीक्षा शुल्क भरल्याबाबतची खातरजमा झाल्यावरच अर्जावर पुढील कार्यवाही केली जाईल. उमेदवारांनी आवश्यक ते परीक्षा शुल्क भरले नसल्यास सदर उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.

**ख)** उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे निवड केली जाईल. त्यासाठी उमेदवारांनी अर्जात दिलेल्या माहितीच्या पुष्ठर्थ्य आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या/कागदपत्रांच्या मूळ प्रती व सांक्षाकिंत प्रती कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने प्राप्त केलेली प्रमाणपत्रे योग्य माध्यमातुन प्राप्त केली नसल्यास किंवा गैरमार्गाने प्राप्त केली असल्यास अथवा खोटी किंवा बनावट असल्याचे दिसून आल्यास उमेदवाराचे नाव भरती प्रक्रीयेतुन बाद करण्यात येईल.

## ९. निवडीची कार्यपद्धती :-

**क)** सर्व उमेदवारांची online वस्तुनिष्ठ चाचणी परीक्षा (Online Objective Test) घेण्यात येईल.

**ख)** उमेदवारांची online वस्तुनिष्ठ चाचणी परीक्षा (Online Objective Test) फक्त इंग्रजी माध्यमातून घेण्यात येईल.

**ग)** उमेदवारांची वस्तुनिष्ठ चाचणी परीक्षा राज्यातील प्रमुख शहरातील केंद्रांवर घेण्यात येईल.

**घ)** निबंध स्वरूपाच्या प्रश्नांचे विषय आणि त्यांची उत्तरे upload करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. वस्तुनिष्ठ चाचणी व निबंध परीक्षा यातून मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे जास्तीत जास्त २०० उमेदवारांची मुलाखतीसाठी निवड करण्यात येईल.

**ङ)** ह्या उमेदवारांची मुलाखत समितीमार्फत मुलाखत घेण्यात येईल.

**च)** अंतिम निवड करताना वस्तुनिष्ठ चाचणी, निबंध व मुलाखत यासाठी अनुक्रमे १५, ३० व ५० असे गुण राहतील. पदव्युत्तर पदवी वा नामांकित संस्थेतून मिळवलेली व्यावसायिक पदवी / पदविका यांच्या उपयुक्ततेनुसार ५ गुण राहतील.

**छ)** मुलाखतीच्या वेळी शैक्षणिक अर्हतेबरोबरच उमेदवाराची सामाजिक व सार्वजनिक कामासंबंधात बांधिलकी, सशक्त चारित्र्य, सकारात्मक दृष्टिकोन, संघ भावनेने काम करण्याची वृत्ती, संबंधित कामाचा अनुभव या आणि इतर बाबी विचारात घेऊन, ५० उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

**ज)** निबंध स्वरूपाच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठीची कार्यपद्धती स्वतंत्रपणे संचालनालयाच्या संकेतस्थळावर देण्यात येईल.

**झ)** वस्तुनिष्ठ चाचणीसाठी अभ्यासक्रम पुढील प्रमाणे आहे.

Medium : English

| Sr No. | Name of Test | Number of Questions | Description | Duration |
|---|---|---|---|---|
| 1 | General Awareness | 50 | India and Maharashtra focused questions on current affairs, general knowledge, social issues and economics. | 60 minutes |
| 2 | Reasoning | 10 | Reasoning | |
| 3 | English Language | 15 | Comprehension, Sentence Correction, and Sentence Completions | |
| 4 | Information Technology | 10 | Windows 2010, MS Office 2010, Internet Explorer | |
| 5 | Quantitative Aptitude | 15 | Will include questions on Data interpretation, Arithmetic, Elementary Algebra, basic concepts of Geometry | |

**१०. फेलोशिप कार्यक्रमासाठी नियुक्तीचा कालावधी :-**

**क)** सदरहू कार्यक्रमांतर्गत ५० फेलोंची फक्त ११ महिन्यांकरिता निवड करण्यात येणार आहे. यामध्ये अधिक वाढ करता येणार नाही.

**११. विद्यावेतन (छात्रवृत्ती):-**

सदरहू कार्यक्रमांतर्गत निवड झालेल्या ५० फेलोंना दरमहा ₹ ३५,०००/- इतकी छात्रवृत्ती (Stipend) देण्यात येईल. सदर छात्रवृत्तीव्यतिरिक्त दरमहा ₹ ५,०००/- प्रवास खर्च देण्यात येईल.

**१२. सर्वसाधारण अटी :-**

**क)** उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेला येण्या जाण्याचा प्रवास खर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही.

**ख)** वयाच्या पुराव्यासाठी जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा सक्षम प्राधिकारी / दंडाधिकारी यांनी दिलेले विहित नमुन्यातील वयाचे प्रमाणपत्र, शासनाच्या किंवा शासनाच्या स्थायी सेवेतील कर्मचाऱ्यांच्या सेवाअभिलेखातील जन्मदिनांक नोंदविलेल्या अभिलेखाची प्रमाणित उताऱ्याची प्रत सादर करणे आवश्यक राहील.

**ग)** शैक्षणिक अर्हतेचा पुरावा म्हणून जाहिरातीत नमूद अर्हतेच्या गुणपत्रक व प्रमाणपत्र यांच्या मूळ व साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील.

**घ)** विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झालेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र यांच्या मूळ व साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

**ङ)** न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक वा तत्सम कारवाईसंबंधीची माहिती अर्जातील संबंधित परीच्छेदात नमूद करावी. नमूद केलेल्या माहितीमध्ये अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल उमेदवाराने संचालनालयास वेळोवेळी कळविणे आवश्यक राहील. ही माहिती न दिल्यास तसेच त्यात नंतर घडून आलेले बदल उमेदवाराने संचालनालयास न कळविल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार संचालनालयास राहतील.

**च)** उमेदवाराने जाहिरातीतील पदासाठी विहित अर्हता धारण केली म्हणजे त्यास नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित अर्हता धारण करीत नाही असे आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्यांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. तसेच अशा उमेदवारांची नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

**छ)** ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जाची व ई-पावतीची प्रत उमेदवाराने स्वत: जवळ काढून ठेवावी. प्रमाणपत्र / कागदपत्र तपासणीवेळेस अर्जाची प्रत व ई-पावती सादर करणे अत्यावश्यक आहे. अर्जाची प्रत तसेच ई-पावती सादर न केल्यास व प्रमाणपत्रामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल व याबाबतीत संचालनालय जबाबदार राहणार नाही.

**ज)** सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, या भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने अद्ययावत सूचना, तारखेतील व इतर बदल संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसारित करण्यात येतील. प्रत्येक उमेदवारास या सूचना स्वतंत्रपणे कळविल्या जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. अद्ययावत सूचनेसाठी संचालनालयाचे संकेतस्थळ उमेदवाराने वारंवार पाहणे आवश्यक आहे.

**झ)** शासन निश्चित करेल त्या क्षेत्रात सदरहू फेलोंना काम करणे/ अनुभव घेणे आवश्यक आहे.

**ञ)** नियुक्ती देण्यात आलेल्या प्रत्येक फेलोला स्वखर्चाने नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे लागेल.

**ट)** फेलो म्हणून नियुक्ती झाल्यानंतर नियुक्तीच्या कालावधीत एखादा फेलो उज्वल भवितव्य असलेल्या किंवा सबळ कारणास्तव त्याने कार्यक्रम सोडल्यास त्याच्याकडून कोणत्याही प्रकारची वसुली करण्यात येणार नाही.

**ठ)** या कार्यक्रमांतर्गत निवड करण्यात आलेल्या उमेदवाराला ११ महिन्यांच्या कराराने फेलोशिप देऊन नियुक्ती करण्यात येईल. सदरहू ११ महिन्यांच्या कालावधीत ७ दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्भूत धरण्यात येईल. असाधारण कामगिरी करणाऱ्या उमेदवारास मुदतवाढ देण्यात येणार नाही. तसेच कराराच्या कालावधीत अध्ययन वेतन किंवा मानधन यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ अनुज्ञेय असणार नाही.

**ड)** महागाई भत्ता, अंतिम किंवा वेतन आयोगाच्या कुठल्याही सेवाविषयक लाभ मिळण्यास ते पात्र नसतील.

**ढ)** करार कालावधीत त्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती अनुज्ञेय नसेल.

**ण)** करार कालावधीतील सेवा, निवृत्ती वेतन, बोनस, रजा प्रवास सवलत, रजा रोखीकरण किंवा अन्य कोणत्याही आर्थिक लाभासाठी विचारात घेण्यात येणार नाही.

**त)** फेलोंना कर्तव्यासाठी मुख्यालयापासून अन्यत्र प्रवास करण्यासाठी दरमहा ₹ ५,०००/- प्रवासभत्याच्या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

**थ)** व्यवसाय कराची वसुली त्यांच्या अध्ययन वेतन/ मानधनातून करण्यात येणार नाही. (वित्त विभागाचे परिपत्रक क्र. PFT-१०७६/प्र. क्र.२९/७६ दि. ५.६.१९७६).

**द)** अध्ययन वेतन/ मानधन मिळविणाऱ्या व्यक्तीला करार करण्यापूर्वी नियुक्ती प्राधिकारी निर्धारित करेल, अशी वैयक्तिक/ अपघात विमायोजना अंतर्गत विमा उतरविण्याबाबत वित्त विभागाच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**ध)** सम संवर्गातील अधिकारी जे कर्तव्य बजावतील ती कर्तव्ये फेलोंची राहतील. त्यानुसार फेलो कार्यालयातील सर्व नियमांचे पालन करून, निर्धारित वेळेनुसार कार्यालयात उपस्थित राहून, कर्तव्य पार पडतील. तसेच या कालावधीत फेलो खाजगी प्रॅक्टिस किंवा पार्ट टाइम नोकरी करू शकणार नाही. सुट्टीच्या दिवशी जर सरकारी कामासाठी कर्तव्य बजवावे लागले, तर त्यासाठी त्यांना कामावर हजर राहणे भाग पडेल.

**न)** कराराच्या ११ महिन्यांच्या कालावधीत त्यांना १० दिवसांची किरकोळ रजा मिळण्यास ते पात्र असतील, अन्य कुठल्याही रजा त्यांनी उपभोगली असल्यास, अध्ययन वेतन/ मानधनातून त्याप्रमाणे कपात करण्यात येईल.

**ऩ)** फेलोंनी मुख्यालयात उपस्थित राहणे गरजेचे आहे व प्राधिकृत अधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही.

**प)** कराराधारित अध्ययन वेतन/ मानधनावर नेमणूक मिळविणाऱ्या व्यक्तीला सरकारी नोकरीत समाविष्ट होण्याचा कुठलाही हक्क प्राप्त होणार नाही.

**फ)** करार कालावधीत फेलोचा मृत्यू झाल्यास वा अपंगत्व आल्यास, त्यांनी बजावलेल्या कर्तव्य काळातील अध्ययन वेतन/ मानधन याची रक्कम त्यांच्या कुटुंबीयांना देण्यात येईल. परंतु, सानुग्रह अनुदान किंवा अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात येणार नाही.

**ब)** फेलोंनी केलेल्या कामगिरीबाबत, कराराच्या कालावधीत तसेच कार्यक्रमाची मुदत संपल्यावरही पूर्ण गुप्तता बाळगण्यात येईल. कराराच्या दरम्यान त्यांनी केलेल्या कामगिरी/संशोधन/माहिती जमा करणे/ मिळालेल्या माहितीच्या आधारे तयार केलेले मुद्दे याबाबत कराराच्या कालावधीत किंवा त्यानंतरही त्यांना कुठलीही माहिती प्राधिकृत अधिकाऱ्याच्या व्यतिरिक्त कोणासही देता येणार नाही.

**भ)** फेलोशिपच्या कालावधीत फेलो कुठल्याही राजकीय चळवळीत भाग घेऊ शकणार नाही. तसेच, त्यांच्याकडून कोणतेही अशोभनीय कृत्य घडणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावयाची आहे. फेलोशिप उमेदवारांनी सचोटी राखणे, निवडणुकीत भाग न घेणे, वृत्तपत्रांना माहिती न देणे, कोणत्याही स्वरूपाच्या देणग्या न घेणे याची दक्षता घ्यावी.

**म)** फेलोशिपच्या संपूर्ण कालावधीत तसेच तद्नंतर फेलोनी केलेल्या कोणत्याही स्वरूपाच्या गुन्हेगारी वा बेकायदेशीर कृत्यांच्या अनुषंगाने त्याच्यावर करण्यात येणाऱ्या कारवाईची जबाबदारी सर्वस्वी फेलोंवर राहील.

**य)** कराराच्या कालावधीत असमाधानकारक कामगिरी किंवा गैरशिस्तीच्या कारणामुळे कोणताही नोटीस न देता त्यांचा फेलो म्हणून नियुक्तीबाबतचा करार समाप्त करण्यात येईल.

**र)** शासनाच्या हितासाठी या अटी/शर्तींमध्ये बदल/वाढ करण्यात आली तर त्या फेलोंवर बंधनकारक राहतील.

**ऱ)** करारची मुदत संपताच, फेलोंची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

**ल)** उपरोक्त सर्व अटी/शर्ती मान्य आहेत, अशा आशयाचे संमतीपत्र नियुक्ती देण्यापूर्वी फेलोंकडून घेण्यात येईल.

## १३. <u>ऑनलाईन परीक्षेसाठी प्रवेशपत्र मिळणे बाबत:-</u>

**क)** प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास ऑनलाईन परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**ख)** **प्रवेशपत्र** :- परीक्षेचे केंद्र, परीक्षेचे ठिकाण, पत्ता, पद, परीक्षा दिनांक आणि वेळ प्रवेशपत्रात नमूद करण्यात येईल.

**ग)** ज्या उमेदवाराने यशस्वीपणे नोंदणी केली आहे त्या उमेदवाराने परीक्षेचे प्रवेशपत्र http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन आपला नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड / जन्मदिनांक हा तपशील भरुन प्राप्त करुन घ्यावयाचे आहे. कोणत्याही उमेदवारास पोस्टाने / कुरीअरने प्रवेशपत्राची प्रत पाठविली जाणार नाही. उमेदवारांना प्रवेशपत्राबाबतची, तसेच परीक्षेबाबतची सूचना त्यांनी नोंदणीच्या वेळी नोंदविलेल्या ई-मेल आयडीवर ई-मेलद्वारे आणि भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेश

सेवेद्वारे पाठविण्यात येईल. उमेदवारास ई-मेल आयडीवर ई-मेलद्वारे पाठविलेल्या आणि भ्रमणध्वनी क्रमांकावरील लघुसंदेश सेवेद्वारे पाठविण्यात आलेल्या सूचना भ्रमणध्वनी क्रमांक/ ई-मेल आयडी बदलल्याने, तांत्रिक अडचणीमुळे किंवा अन्यथा अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे उमेदवारास उशिराने मिळाल्याबाबत / न मिळाल्याबाबत अर्थ व सांख्यिकी संचालनालय जबाबदार राहणार नाही. म्हणून भरती प्रक्रीयेबाबतचा अधिक तपशील, अद्ययावत माहिती व इतर माहितीसाठी उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी वेळीवेळी अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच त्यांनी नोंदविलेला ई-मेल अकाऊंट वेळोवेळी तपासावे.

**१४. <u>निवड प्रक्रियेदरम्यान गैरवर्तणूक /अनुचित प्रकार/गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करावयाची कार्यवाही</u>:-**

उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरतांना दडवून ठेवू नये.

परीक्षेच्या वेळात किंवा एकूणच निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवार,

१. अनुचित प्रकार करणे किंवा
२. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा
३. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, उद्धृत करणे, पाठवणे, साठवणे किंवा पाठविणे आणि साठविणे सुकर करणे किंवा
४. स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पद्धतीचा अवलंब करणे किंवा
५. स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा
६. दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे.

**अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कार्यवाहीस सामोरे जाण्यासह सदर उमेदवारास त्या परीक्षेसाठी त्या उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल.**

**१५. ऑनलाईन परीक्षेच्या दिवशी तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी उपस्थित राहणाऱ्या उमेदवाराचा बायोमेट्रिक डाटा (अंगठ्याचा ठसा) तपासला जाणार असल्याने जर बोटांवर कसलाही थर असेल (शाई/मेहंदी/रंग इत्यादी) तर ऑनलाईन परीक्षेच्या दिवशी तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी तो थर संपूर्णपणे नाहीसा झाल्याची उमेदवाराने खात्री करून घ्यावी.**

***